**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,** पनचक्की, औरंगाबाद-४३१००२
**Maharashtra State Board of Waqfs**, Panchakki, Aurangabad-431002
**مہاراشٹراسٹیٹ وقف بورڈ**، پن چکی، اورنگ آباد۔ ۴۳۱۰۰۲
Webside: www.mahawakf.com, Email: ceomsbw@gmail.com Tele: 0240-2401584

**No. MSBW/EST/4790/2023** **Dated: 4.08.2023**

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या आस्थापनेवरील जिल्हा वक्फ अधिकारी, कनिष्ठ लिपिक, लघुटंकलेखक, कनिष्ठ अभियंता व विधि सहायक ही पदे सरळसेवेने भरण्यासाठीची जाहिरात २०२३**

१. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ व त्याच्या अधिनस्त कार्यालयांच्या आस्थापनेवरील जिल्हा वक्फ अधिकारी, कनिष्ठ लिपिक, लघुटंकलेखक, कनिष्ठ अभियंता व विधि सहायक ही पदे सरळसेवेने भरण्याकरता सदर पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अल्पसंख्याक विकास विभागाच्या **https://mdd.maharashtra.gov.in** व वक्फ मंडळाच्या **https://mahawakf.com** आणि **https://mahawaqf.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर रोजगार/पदभरती या शिर्षाखाली फक्त ऑनलाईन पध्दतीने **दिनांक ०५ ऑगस्ट २०२३ पासुन दिनांक ४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत** अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांकरिता पात्र असणारे महाराष्ट्र राज्यातील उमेदवार अर्ज करू शकतील. सदर पदांवरील भरतीकरता ऑनलाईन परीक्षा महाराष्ट्रातील निश्चित केलेल्या जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी नेमुन दिलेल्या केंद्रावर घेण्यात येईल. ऑनलाईन परीक्षेची तारीख अल्पसंख्याक विकास विभागाच्या **https://mdd.maharashtra.gov.in** व वक्फ मंडळाच्या **https://mahawakf.com** आणि **https://mahawaqf.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

२. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ व त्याच्या अधिनस्त कार्यालयांच्या आस्थापनेवरील जिल्हा वक्फ अधिकारी, कनिष्ठ लिपिक, लघुटंकलेखक, कनिष्ठ अभियंता व विधि सहायक या संवर्गातील भरावयाच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| **अ.क्र.** | **संवर्ग** | **भरावयाची पदे** |
|---|---|---|
| १ | जिल्हा वक्फ अधिकारी/अधिक्षक | २५ |
| २ | कनिष्ठ लिपिक | ३१ |
| ३ | लघुटंकलेखक | १ |
| ४ | कनिष्ठ अभियंता | १ |
| ५ | विधि सहायक | २ |
| **एकूण** | | **६०** |

३. **पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधर तरतुदी:-**

**३.१** जाहिरातीत नमूद केलेल्या पदांना कोणतेही आरक्षण लागू राहणार नाही.

**३.२** जाहिरातीत नमूद केलेल्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

**३.३** पदसंख्येत बदल झाल्यास घोषणा/सूचना वेळोवेळी अल्पसंख्याक विकास विभागाच्या/महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/ सूचनांच्या आधारे प्रस्तुत स्पर्धा परीक्षेमधुन भरावयाच्या पदांकरता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

**३.४** परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या संख्येमध्ये बदल करण्याची अधिकार नियुक्ती प्राधिकारी व त्यांचे नियंत्रण अधिकारी यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

**३.५** वेतनश्रेणी:-

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १ | जिल्हा वक्फ अधिकारी/ अधिक्षक | वेतनश्रेणी रु. ९३००- ३४८०० + ग्रेड पे ४२०० (महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, इत्यादी) |
| २ | कनिष्ठ लिपिक | वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० + ग्रेड पे १९०० (महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, इत्यादी) |
| ३ | लघुटंकलेखक | वेतनश्रेणी रु. ९३००- ३४८०० + ग्रेड पे ४३०० (महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, इत्यादी) |
| ४ | कनिष्ठ अभियंता | वेतनश्रेणी रु. ९३००- ३४८०० + ग्रेड पे ४३०० (महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, इत्यादी) |
| ५ | विधि सहायक | वेतनश्रेणी रु. ९३००- ३४८०० + ग्रेड पे ४२०० (महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, इत्यादी) |

**(वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय राहील.)**

**३.६ पात्रता:-**

**(अ) वयोमर्यादा-**

जाहिरातीत नमुद केलेल्या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय दि. १ जुलै २०२३ या तारखेस गणण्यात येईल. सर्व पदांसाठी किमान वय १८ वर्ष असावे व कमाल ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या सेवेत कार्यरत कर्मचा-यांसाठी कमाल वयोमर्यादा ४८ वर्ष इतकी राहील.

**(ब)** अर्जदार हा मुस्लिम असावा.

**(क)** अर्जदारास उर्दू भाषेचे ज्ञान असणे (लिहिणे, वाचणे आणि बोलणे) आवश्यक आहे.

**३.७ शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| १ | जिल्हा वक्फ अधिकारी/ अधिक्षक | शैक्षणिक अर्हता :- सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील (किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण) पदवी. |

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| २ | कनिष्ठ लिपिक | १. शैक्षणिक अर्हता :- सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील (किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण) पदवी.<br>२. तांत्रिक अर्हता :- मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र |
| ३ | लघुटंकलेखक | १. शैक्षणिक अर्हता :- किमान माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र<br>२. तांत्रिक अर्हता :- १०० शब्द प्रति मिनिट यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे मराठी किंवा इंग्रजी लघुलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आणि मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र |
| ४ | कनिष्ठ अभियंता | १. शैक्षणिक अर्हता :- सांविधिक विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी.<br>२. अनुभव :- आवश्यक शैक्षणिक (अ.क्र. १ प्रमाणे) पात्रता मिळविल्यानंतर उद्योग क्षेत्रात आणि/ किंवा शासकीय विभागात / किंवा औद्योगिक उपक्रमात किंवा वाणिज्य संस्थेत / शासनाद्वारे स्थापित स्थानिक स्वराज्य संस्थेत/महामंडळे/मंडळे यामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी कार्य हाताळण्याचा किमान २ वर्षांचा व्यवहारिक अनुभव |
| ५ | विधि सहायक | १. शैक्षणिक अर्हता :- सांविधिक विद्यापीठाची विधी (Law) शाखेतील पदवी.<br>२. अनुभव :- मा. उच्च न्यायालय वा कनिष्ठ न्यायालयात किमान तीन वर्षे वकिलीचा अनुभव किंवा<br>उमेदवार महाराष्ट्र शासनाच्या विधि व न्याय विभागात विधि सहायक या पदावर कार्यरत असावा किंवा काम केलेले असावे. |

**३.८ अर्हता / पात्रता गणण्याचा दिनांक :-**

सर्व पदांकरिता दिनांक १ जुलै २०२३ या तारखेस किंवा त्यापूर्वी विहित शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण केलेला असणे अनिवार्य आहे.

**३.९ वयाची अट/ अनुभवाची अट शिथिलतेबाबत :-**

अपवादात्मक पात्रता किंवा अनुभव किंवा दोन्ही बाळगून असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत वयाची अट/ अनुभवाचा कालावधी यामध्ये सूट देण्याचा वा त्या उमेदवारांना प्राधान्य देण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांना आहे.

**४. निवडप्रकिया:-**

४.१ जाहिरातीमध्ये नमूद अर्हता / पात्रते विषयक अटी किमान असून केवळ किमान अर्हता धारण केली म्हणुन उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

४.२ सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ भरती विनियमने २०१७ तसेच तदनंतर शासनाकडून/निवड समितीकडून प्राप्त निदेशानुसार राबविण्यात येईल.

**५. निवडीची पध्दत:-**

५.१ सर्व पदांसाठी मुख्यत्वे मराठी तसेच इंग्रजी या दोन्ही माध्यमातुन संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपात घेण्यात येईल. परीक्षा राज्यातील निश्चित केलेल्या जिल्हयाच्या मुख्यालयी घेण्यात येईल.

५.२ संगणक आधारीत परीक्षेद्वारे (Computer Based online examination) घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भात होण्यासाठी उमेदवाराने किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

५.३ संगणक आधारीत (Computer Based online examination) परीक्षेसाठी अभ्यासक्रम व इतर तपशील खालीलप्रमाणे राहील:

| पदाचे नाव | तपशिल |
|---|---|
| **जिल्हा वक्फ अधिकारी/ कनिष्ठ लिपिक/ लघुटंकलेखक** | या पदांसाठी मराठी (१० प्रश्न) , इंग्रजी (१० प्रश्न), उर्दू (१० प्रश्न), सामान्य ज्ञान (३५ प्रश्न) व बौध्दीक चाचणी (३५ प्रश्न) या विषयावरील एकूण १०० प्रश्न विचारण्यात येतील. प्रत्येक प्रश्नासाठी २ गुण याप्रमाणे प्रश्नपत्रिका एकूण २०० गुणांची असेल. परीक्षेचा कालावधी १२० मिनिटांचा राहील. |
| **कनिष्ठ अभियंता** | या पदांसाठी मराठी (१० प्रश्न) , इंग्रजी (१० प्रश्न), अभियांत्रिकी (३० प्रश्न), सामान्य ज्ञान (२५ प्रश्न) व बौध्दीक चाचणी (२५ प्रश्न) या विषयावरील एकूण १०० प्रश्न विचारण्यात येतील. प्रत्येक प्रश्नासाठी २ गुण याप्रमाणे प्रश्नपत्रिका एकूण २०० गुणांची असेल. परीक्षेचा कालावधी १२० मिनिटांचा राहील. |

| | |
|---|---|
| **विधि सहायक** | या पदांसाठी मराठी (१० प्रश्न), इंग्रजी (१० प्रश्न), विधी विषयक (३० प्रश्न), सामान्य ज्ञान (२५ प्रश्न) व बौध्दीक चाचणी (२५ प्रश्न) या विषयावरील एकूण १०० प्रश्न विचारण्यात येतील. प्रत्येक प्रश्नासाठी २ गुण याप्रमाणे प्रश्नपत्रिका एकूण २०० गुणांची असेल. परीक्षेचा कालावधी १२० मिनिटांचा राहील. |
| परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. तथापि, त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२वी) दर्जाच्या समान राहील. | |

## ६. शुल्क:-

६.१ प्रति उमेदवार परिक्षा शुल्क रु. १०००/- (रुपये एक हजार मात्र) इतके असेल.

६.२ सदर शुल्क हे केवळ एका संवर्गाच्या परिक्षेसाठी असेल. एकापेक्षा जास्त संवर्गासाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रति संवर्ग वेगळे शुल्क भरावे लागेल.

६.३ उपरोक्त परीक्षा शुल्का व्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

६.४ परीक्षा शुल्क ना-परतावा (Non refundable) आहे.

## ७. अर्ज करण्याची पध्दत:-

७.१ प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येईल.

७.२ पात्र उमेदवाराला वेब आधारीत (web-based) ऑनलाईन अर्ज https://mdd.maharashtra.gov.in व https://mahawakf.com आणि https://mahawaqf.maharashtra.gov.in या संकेतस्थळाद्वारे दिनांक ०५ ऑगस्ट २०२३ पासुन दिनांक ०४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

७.३ विहीत पध्दतीने अर्ज ऑनलाईन सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय परीक्षेसाठी उमेदवारी विचारात घेतली जाणार नाही.

## ८. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा सविस्तर सूचना:-

८.१ उपरोक्त पदांच्या भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज अल्पसंख्याक विकास विभागाच्या https://mdd.maharashtra.gov.in व https://mahawakf.com आणि https://mahawaqf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर मागविण्यात येत आहेत. पात्र उमेदवारांना विभागाच्या संकेतस्थळावर दिनांक ०५ ऑगस्ट २०२३ पासुन दिनांक ०४ सप्टेंबर २०२३ या कालावधील वेब बेस्ड (web-based) ऑनलाईन आवेदन पत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणा

दिनांक ०५ ऑगस्ट २०२३ पासुन दिनांक ०४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत या कालावधीत करता येईल.

८.२ विहित पध्दतीने मुदतीत म्हणजेच दिनांक ०५ ऑगस्ट २०२३ पासुन दिनांक ०४ सप्टेंबर २०२३ पर्यंत सादर सादर केलेल्या उमेदवारांनी शुल्क भरण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने रक्कम भरण्याची कार्यवाही दिनांक ०५ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ९.०० वा. पासुन दिनांक ०४ सप्टेंबर २०२३ रोजी रात्री २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेब लिंक बेद होईल.

८.३ परीक्षा स्थगित व रद्द करणे, परीक्षेचे स्वरूप, परीक्षेची तारीख व ठिकाणात बदल करणे, पदसंख्या वाढ किंवा घट करण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास (निवड- मंडळास) राहतील व निवड मंडळाने घेतलेला निर्णय अंतिम असेल, त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वा तक्रारी बाबत निर्णय घेण्याचा अधिकार निवड मंडळास राहील व निवड मंडळाचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

८.४ उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व पात्रता तपासूनच उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरावा.

८.५ उमेदवारांची परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्व तपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. उमेदवाराना ऑनलाईन परीक्षेतील मिळालेल्या गुणांच्या आधारे तसेच त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करून उमेदवाराच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ राखून ठेवीत आहेत.

८.६ परीक्षेच्या वेळी केंद्रात किंवा परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल, गणकयंत्र (calculator), आय पॅड वा तत्सम इलेक्ट्रॉनिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधन वापरण्यास सक्त मनाई आहे.

८.७ उमेदवारास परीक्षा / कागदपत्र पडताळणी इत्यादी करीता स्वखर्चाने यावे लागेल.

८.८ ऑनलाईन परीक्षा स्थळामध्ये वाढ/बदल करण्याचे अधिकार निवड समितीस राहतील, परिक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

८.९ परीक्षेचे प्रवेशपत्र उक्त संकेतस्थळावरून स्वत: डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने पाठविले जाणार नाही.

८.१० पात्र उमेदवारांच्या अंतिम निकाल अल्पसंख्याक विकास विभागाच्या https://mdd.maharashtra.gov.in व https://mahawakf.com आणि https://mahawaqf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.

## ९. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्यापूर्वी लक्षात घेण्यासारखे महत्तवाचे मुद्दे:-

९.१ ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी खालीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे / स्वाक्षरी इत्यादीचे स्कॅन करून ठेवावे.

- ९.१.१ छायाचित्र (४.५ सें.मी. X ३.५ सें.मी.)
- ९.१.२ स्वत:ची स्वाक्षरी (काळया शाईने)
- ९.१.३ स्वत:च्या डाव्या अंगठयाचा ठसा (काळया किंवा निळया शाईच्या पांढऱ्या कागदावर)
- ९.१.४ इंग्रजी भाषेतील खली दिलेला मजकुर असलेले स्वहस्ताक्षरात लिहिलेले घोषणापत्र (पांढऱ्या कागदावर काळया शाईने)

९.२ हे सर्व स्कॅन केलेले दस्तऐवज या जाहिरातीतील मुद्दा ११ मध्ये नमूद तपशिलाप्रमाणे आहेत याची खात्री उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी करावी.

९.३ इंग्रजी भाषेतील मोठया अक्षरातील (Capital Letters) स्वाक्षरी स्विकारली जाणार नाही.

९.४ डाव्या अंगठयाचा ठसा योग्यरित्या स्कॅन केलेला असावा आणि त्यावर डाग येऊ देऊ नये. (उमेदवारास डावा अंगठा नसल्यास असा उमेदवार अर्ज करण्यासाठी उजव्या अंगठयाचा वापर करू शकता.)

९.५ हस्तलिखित घोषणेचा मजकूर खालीलप्रमाणे आहे :

" I, ………..(name of the candidate) hereby declare that all the information submitted by me in the application form is corrent, true and valid. I will present the supporting documents as and when required."

९.६ वर नमुद केलेले घोषणापत्र उमेदवाराने स्वहस्तलिखित आणि फक्त इंग्रजी भाषेत लिहिलेले असावे. घोषणापत्र इतर कोणत्याही भाषेत लिहिलेले आणि अपलोड केले असल्यास, त्या उमेदवाराचा अर्ज अवैध मानला जाईल.

९.७ ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणा करण्यासाठी आवश्यक सर्व माहिती व कागदपत्रे तयार ठेवावीत.

९.८ उमेदवारांकडे स्वत:च्या चालू स्थितीतील वैध वैयक्तिक ई-मेल आयडी आणि भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक असावा, स्वत:चा ई-मेल आयडी नसल्यास तो तयार करून घेण्यात यावा. वैयक्तिक ई-मेल आयडी आणि भ्रमणध्वनी क्रमांक सदरची भरती प्रक्रिया होईपर्यंत चालू (सक्रिय) ठेवावा. नोंदणीकृत ई-मेल आयडीद्वारे परीक्षेसाठी प्रवेश पत्र डाऊनलोड करण्यासाठी सूचना देण्यात येतील.

## १०. अर्ज भरण्याची कार्यपध्दती आणि सूचना:-

१०.१अर्ज नोंदणी-

१०.१.१ उमेदवाराला अल्पसंख्याक विकास विभागाच्या https://mdd.maharashtra.gov.in किंवा https://mahawakf.com किंवा https://mahawaqf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन (Log in) करावे लागेल.

१०.१.२ उमेदवारांनी संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज करा (APPLY ONLINE) या पर्यायावर क्लिक (Click) करा जे एक नवीन स्क्रीन उघडेल.

१०.१.३ अर्ज नोंदणी करण्यासाठी, नवीन नोंदणीसाठी येथे क्लिक करा (Click here for New Registration) टॅब निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ई-मेल आयडी प्रविष्ट करा. प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि स्क्रीनवर प्रदर्शित केला जाईल. उमेदवाराने तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा. तात्पुरती नोंदणी क्रमांक (Registration No) आणि पासवर्ड (Passward) दर्शविणारा ई-मेल आणि एसएमएस देखील पाठविला जाईल.

१०.१.४ जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरू शकत नसेल, तर तो “जतन करा पुढे जा” (Save and Next) टॅब निवडून आधीच प्रवेश केलेला डेटा जतन करू शकतो. ऑनलाईन अर्ज सबमिट करण्यापूर्वी उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशीलांची पडताळणी करण्यासाठी व आवश्यक बदल करण्यासाठी “जतन करा पुढे जा ” (Save and Next) सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

१०.१.५ उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये तपशील काळजीपूर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी स्वत:करावी. एकदा “पूर्ण नोंदणी बटणावर” (COMPLETE REGISTRATION BUTTON) क्लिक केल्यानंतर अर्जामध्ये कोणताही बदला करता येणार नाही.

१०.१.६ उमेदवाराने स्वत:चे नाव, त्याचे/तिचे किंवा वडील / पती इ.चे जसे प्रमाणपत्रे / गुणपत्रिका / ओळखपत्र पुराव्यामध्ये नमुद आहे त्याप्रमाणेच अर्जामध्ये नमुद करण्यात यावे. उमेदवाराच्या ओळखपत्र/पुराव्यामधील नाव व अर्जामध्ये नमुद केलेले नाव यामध्ये कोणताही बदल आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरू शकते.

१०.१.७ उमेदवारांनी अर्जामध्ये नमूद केलेले तपशील सत्यापित (Click) करून आपला अर्ज जतन करण्यासाठी Validate your details व Save and Next बटणावर क्लिक (Click) करून अर्ज जतन करावा.

१०.१.८ या सुचनांमध्ये नमुद मुद्दा क्र. ११ मध्ये छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कँनिग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमुद केलेल्या तपशिलानुसार उमेदवार त्यांचे फोटो व स्वाक्षरी अपलोड करू शकतील.

१०.१.९ उमेदवाराने त्यांचे इतर तपशील अर्जामध्ये नमूद करावेत.

१०.१.१० अर्जाच्या संपूर्ण नोंदणीपूर्वी अर्जदाराने आपल्या अर्जाचे पुर्वावलोकन आणि पडताळणी करण्यासाठी Preview बटणावर क्लिक करून अर्जाचे पूर्वावलोकन व पडताळणी करावी व भरलेले अर्ज, छायाचित्र, स्वाक्षरी आणि इतर तपशील बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच COMPLETE REGISTRATION ONLY / पूर्ण नोंदणी वर क्लिक करावा.

टीप:

अ) USERNAME आणि PASSWARD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल.

ब) उमेदवाराने नोंदणी प्रक्रीयेसाठी स्वत:चाच वैध/प्रमाणित ई-मेल आयडी वापरावा. अन्य व्यक्तींचा ई-मेल आयडी वापरू नये.

१०.२ परिक्षा शुल्काची अदायगी :-

१०.२.१ परीक्षा शुल्क भरणा करण्यासाठी (Payment) टॅबवर क्लिक (Click) करा आणि परीक्षा शुल्क भरण्यासाठी (Fees Payment) साठी पुढे जावे.

१०.२.२ सादर (Submit) बटणावर क्लिक (Click) करा.

१०.२.३ ऑनलाईन अर्ज परीक्षा शुल्कासह भरण्याची सुविधा (paymen gateway) उपलब्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार परीक्षा शुल्क भरण्याबाबत दिलेल्या सूचनांचे अनुसरण करून परीक्षा शुल्क भरणा करण्यात यावा.

१०.२.४ परीक्षा शुल्क भरणा डेबिट कार्ड (RuPay/Visa/MasterCard/Maestro), क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, IMPS, कॅश कार्ड/मोबाईल वॉलेट वापरून केले जाऊ शकते.

१०.२.५ ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने परीक्षा शुल्क भरल्या बाबतची माहिती सादर केल्यानंतर, कृपया सर्व्हरकडून प्रतिसाद मिळण्याची प्रतीक्षा करा. परीक्षा शुल्क पुनरावृत्ती टाळण्यासाठी मागे (Back)/रिफ्रेश (Refresh) बटण (Key) दावू नये.

१०.२.६ व्यवहार यशस्वीरित्या पूर्ण झाल्यावर, एक ई-पावती (E-Receipt) तयार होईल.

१०.२.७ ई-पावती (E-Receipt) तयार न होणे परीक्षा शुल्क भरणा अयशस्वी झाल्याचे दर्शवते. Payment अयशस्वी झाल्यास, उमेदवारांनी त्यांचा तात्पुरता नोंदणी क्रमांक (Registration No) आणि पासवर्ड (Passward) वापरून पुन्हा लॉन इन करावे आणि Payment ची प्रक्रिया पुनश्च: पूर्ण करण्यात यावी.

१०.२.८ उमेदवारांनी परीक्षा शुल्क भरल्याची ई-पावती (E-Receipt) आणि फी चा तपशील असलेल्या ऑनलाईन अर्जाची मुद्रीत प्रत (Print Out) काढून घणे आवश्यक आहे. ई-पावती व अर्जाची प्रत स्क्रीनवर न आल्यास ऑनलाईन व्यवहार यशस्वी झाला नसल्याचे दर्शविते.

१०.२.९ क्रेडिट कार्ड वापर कर्त्यांसाठी:- सर्व शुल्क भारतीय रूपयामध्ये सूचीबध्द आहेत. तुम्ही गैर-भारतीय क्रेडिट कार्ड वापरत असल्यास, तुमची बँक प्रचलित विनिमय दरांवर आधारित तुमच्या स्थानिक चलनात रूपांतरित करेल.

१०.२.१० तुमच्या डेटाची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, कृपया तुमचा व्यवहार पूर्ण झाल्यावर ब्राउझर विंडो (Browser window) बंद करा.

१०.२.११ फी भरल्याचा तपशील असलेल्या अर्जाची मुद्रीत प्रत (Print out) काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

## ११. स्कॅनिंग आणि कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक सूचना:-

ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराकडे खाली दिलेल्या तपशिलानुसार त्याचे छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठयाचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र यांची स्कॅन केलेले (डिजिटल) प्रतिमा असणे आवश्यक आहे.

**११.१ छायाचित्र प्रतिमा : (४.५cm X ३.५cm):-**

११.१.१ छायाचित्र अलीकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत असणे आवश्यक आहे.

११.१.२ सदरचे छायाचित्र रंगीत, हलक्या रंगाच्या विरूध्द, शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीवर घेतलेले आहे याची खात्री करा.

११.१.३ कॅमेऱ्याकडे शांतपणे व स्थिर नजरेने पाहावे.

११.१.४ छायाचित्र सुर्यप्रकाशात काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी.

११.१.५ तुम्हाला फ्लॅश वापरायचा असल्यास, "Red Eye" येणार नाही याची दक्षता घ्यावी.

११.१.६ जर तुम्ही चष्मा घालत असाल तर त्यात कोणतेही प्रतिबिंब येणार नाही आणि तुमचे डोळे स्पष्टपणे दिसु शकतील याची खात्री करा.

११.१.७ छायाचित्र काढतेवेळी टोपी, हॅट व गडद चष्मा घालू नये. धार्मिक पगडी (Headwear) वापरण्यास परवानगी आहे. परंतु त्याने तुमचा चेहरा झाकता कामा नये.

११.१.८ परिमाण २०० X २३० पिक्सेल (प्राधान्याने).

११.१.९ फाईलचा आकार २०kb - ५० kb दरम्यान असावा.

११.१.१० स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार ५०kb पेक्षा जास्त नसल्याची खात्री करा. जर फाईलचा आकार ५०kb पेक्षा जास्त असेल, तर स्कॅनरची सेटिंग्ज समायोजित करा जसे की DPI रिझोलुशन, नंबर ऑफ कलर इ.

**१२. स्वाक्षरी, डाव्या अंगठयाचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र प्रतिमा:-**

१२.१ अर्जदाराला पांढऱ्या कागदावर काळया शाईच्या पेनने स्वाक्षरी करावी लागेल.

परिमाण १४० X ६० पिक्सेल (प्राधान्याने)

फाईलचा आकार १०kb - २०kb दरम्यान असावा. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार २०kb पेक्षा जास्त नसल्याची खात्री करा.

१२.२ अर्जदाराने त्याच्या अंगठयाचा ठसा काळया किंवा निळया शाईने पांढऱ्या कागदावर लावावा.

१२.३ फाईल प्रकार :- jpg/jpeg

१२.४ परिमाणे:- २०० DPI मध्ये २४० x २४० पिक्सेल (आवश्यक गुणवत्तेसाठी प्राधान्य) म्हणजे ३ सेमी # ५ सेमी (रूंदी # उंची)

१२.५ फाईल आकार :- jpg/jpeg

१२.६ परिमाणे:- २०० DPI मध्ये ८०० x ४०० पिक्सेल (आवश्यक गुणवत्तेसाठी प्राधान्य) म्हणजे १० सेमी # ५ सेमी (रूंदी # उंची)

१२.७ फाईल आकार :- ५०kb - १००kb

१२.८ स्वाक्षरी, डाव्या अंगठयाचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अर्जदाराचे स्वत:चे असावे, इतर कोणत्याही व्यक्तीचे नसावे.

१२.९ परीक्षेच्या वेळी स्वाक्षरी केलेल्या उपस्थिती पत्रकावरील किंवा प्रवेश पत्रावरील अर्जदाराची स्वाक्षरी, अपलोड केलेल्या स्वाक्षरीशी जुळत नसल्यास, अर्जदारास अपात्र घोषित केले जाईल.

१२.१० इंग्रजी मोठया अक्षरातील (Capital Letters) स्वाक्षरी / हस्तलिखित घोषणापत्र स्वीकारली जाणार नाही.

**१३. कागदपत्रे स्कॅन करणे:-**

१३.१ स्कॅनर रिझोल्यूशन किमान किमान २०० dpi (बिंदू प्रति इंच) वर सेट करा.

१३.२ रंग मूळ रंगावर सेट करा.

१३.३ वर नमूद केल्याप्रमाणे फाईलचा आकार असावा.

१३.४ स्कॅनरमधील प्रतिमा छायाचित्र / स्वाक्षरी / डाव्या अंगठयाचा ठसा / हाताने लिहिलेल्या घोषणेच्या काठावर क्रॉप करा, नंतर प्रतिमा अंतिम आकारात क्रॉप करून अपलोड करावी. (वर नमुद केल्याप्रमाणे).

१३.५ प्रतिमा फाईल JPG किंवा JPEG फॉरमॅटमध्ये असावी. उदा:- image०१.jpg किंवा image०१.jpeg. फोल्डर फायलीमध्ये सूचीबध्द करून किंवा फाईल प्रतिमा चिन्हावर माउस हलवून प्रतिमा परिमाण तपासले जाऊ शकते.

१३.६ MS Windows / MS Office वापरणारे उमेदवार MS Paint किंवा MS Office Picture Manager वापरून .jpeg फॉरमॅटमध्ये कागदपत्रे सहज मिळवू शकतात. फाइल मेनूमधील - " Save As/सेव्ह अॅज " पर्याय वापरून कोणत्याही फॉरमॅटमध्ये स्कॅन केलेले दस्तऐवज .jpg/jpeg फॉरमॅटमध्ये जतन केले जाऊ शकतात. क्रॉप आणि नंतर आकार बदला पर्याय वापरून आकार समायोजित केला जाऊ शकतो.

**१४. कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया-**

१४.१ ऑनलाईन अर्ज भरतांना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठयाचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.

१४.२ संबंधित लिंकवर क्लिकम करा "छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड करा / डाव्या अंगठयाचा ठसा / स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र" अपलोड करा.

१४.३ स्कॅन केलेले छायाचित्र / स्वाक्षरी / डाव्या अंगठयाचा ठसा / स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील फाईल सेव्ह केलेली जागा ब्राउझ करा आणि निवडा.

१४.४ त्यावर क्लिक करून फाईल निवडा.

१४.५ ओपन/अपलोड वर क्लिक करा.

१४.६ फाईलचा आकार आणि स्वरूप निर्धारित केल्याप्रमाणे नसल्यास, एक त्रुटी संदेश प्रदर्शित केला जाईल.

१४.७ अपलोड केलेल्या प्रतिमेची गुणवत्ता पाहण्यास पूर्वावलोकन (Preview) मदर करेल. अस्पष्ट / डागाळलेल्या प्रतिमा असल्यास त्या जागी स्पष्ट प्रतिमा पुनश्च: अपलोड करता येतील.

१४.८ उमेदवाराने स्वत:चा फोटो, स्वाक्षरी, डाव्या अंगठयाचा ठसा आणि विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र केल्याशिवाय त्यांचा ऑनलाईन अर्ज नोंदणी होणार नाही.

**टीप:-**

**१.** छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी डाव्या अंगठयाचा ठसा किंवा स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.

**२.** उमेदवाराने ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र/स्वाक्षरी/डाव्या अंगठयाचा ठसा/ स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केल्या आहेत हे तपासावे. छायाचित्र किंवा स्वाक्षरी किंवा डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा किंवा स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील ठळकपणे दृश्यमान नसल्यास, उमेदवार आपला अर्ज संपादित (Edit) करू शकतो आणि त्याचे छायाचित्र किंवा स्वाक्षरी किंवा डाव्या अंगठयाचा ठसा किंवा हाताने लिहिलेली घोषणा फॉर्म सबमिट करण्यापूर्वी पुन्हा अपलोड करू शकतो.

**३.** उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करतेवेळी त्याचा फोटो व स्वाक्षरी ज्या ठिकाणी फोटो अपलोड करणे अपेक्षित आहे त्याच ठिकाणी अपलोड केले आहे याची खात्री करावी. फोटोच्या जागी फोटो आणि स्वाक्षरीच्या जागी स्वाक्षरी अपलोड

केलेलली नसल्यास उमेदवाराला परीक्षेला बसू दिले जाणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची असेल.

**४.** उमेदवाराने अपलोड करावयाच्या फोटो आवश्यक आकाराचाच आहे व त्यामध्ये उमेदवाराचा चेहरा स्पष्टपणे दिसत आहे हे सुनिश्चित केले पाहिजे.

**५.** उमेदवारांनी अपलोड केलेली स्वाक्षरी स्पष्टपणे दिसत असल्याची खात्री करावी.

**६.** ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाईन अर्जाची मुद्रीत प्रत (Print Out) काढून घ्यावी.

## १५. अर्ज करण्याची इतर सूचना:

१५.१ उमेदवाराचे नाव, वडिलांचे, पतीचे नाव, आडनाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी, पत्रव्यवहाराच्या पत्ता ही माहिती आहे जी उमेदवारला द्यावी लागेल.

१५.२ पत्ता नमुद करताना उमेदवाराने आपल्या पत्तयाचा प्रकार निश्चित करावा. (उदा. पत्रव्यवहाराचा पत्ता व कायमचा पत्ता किंवा दोन्ही)

१५.३ त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी.

१५.४ ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी तसेच उमेदवाराने आधार क्रमांक / आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी.

१५.५ मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र (D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळ यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र) या संबंधीची माहिती भरावी.

१५.६ एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केल्यानंतर अर्जदारास पुढे (Next) या बटणावर क्लिक करावे लागेल. त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल. कि त्यांना ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादीत करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

१५.७ उमेदवार अर्ज करावयाच्या पदाची निवड करावी लागेल. ऑनलाईन अर्ज स्विकारणाच्या अंतिम तारखेस रात्री २३.५९ वाजेपर्यत पुर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर संकेतस्थळावरील लिंक बंद होऊल.

१५.८ जर कोणत्याही उमेदवाराने एक पेक्षा अधिक लॉगिन आयडी सह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची नव्याने केलेली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे, परीक्षा प्रवेशपत्र, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी, आणि अन्य संबंधीत प्रक्रियांसाठी

विचारात घेण्यात येईल. उमेदवारास ऑनलाईन अर्ज करतांना कोणतीही शंका असल्यास त्यबाबत https//cgrs.ipbs.in या हेल्प डेस्क लिंक (Help Desk) वर संपर्क साधता येईल.

**टीप:-** नोंदणीमधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME) ई-मेल आयडी, पसंतीचे स्थान, जन्म तारीख, उमेदवाराचे छायाचित्र (Photograph) आणि स्वाक्षरी इत्यादी आवेदन पत्र सादर केल्यानंतर बदण्याची परवानगी दिली जाणार नाही.

१५.९ अर्जातील माहितीचे पूर्वालोकन:-

१५.९.१ युजरनेम आणि पासवर्ड वापरून लॉग-इन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.

१५.९.२ अर्ज प्रिंट करण्यासाठी "प्रिंट प्रिव्यहू " या पर्यायावर क्लिक करा.

**नोंद:-** उमदेवाराने आपला PDF स्वरूपातील अर्ज, परीक्षा प्रवेशपत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यत स्वत: जवळ जतन करून ठेवणे अनिवार्य राहील.

## १६. परीक्षा केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधरण सूचना:-

१६.१ उमेदवारांना नेमून दिलेले परीक्षा केंद्र व त्याचा पत्ता प्रवेश पत्रात नमूद करण्यात येईल. संबंधित परीक्षा केंद्रावर ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेतली जाईल.

१६.२ उमेदवाराने एकदा केलेली परीक्षा केंद्राची निवड अंतिम असेल. परीक्षेचे केंद्र / स्थळ/ तारीक्ष/वेळ सत्र बदलण्याची कोणतीही विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी) स्विकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.

१६.३ कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे आणि / किंवा परीक्षा केंद्र वाढविणे याचे अधिकार निवड समिती स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

१६.४ उमेदवाराला त्याने / तिने निवडलेल्या केंद्रा व्यतिरिक्त इतर कोणतेही केंद्र वाटप करण्याचा अधिकार निवड समिती स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

१६.५ उमेदवाराने परीक्षा केंद्रावर स्वत:च्या जोखमीवर आणि स्वखर्चाने उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यास कोणताही प्रवास खर्च वा भत्ता दिला जाणार नाही किंवा उमेदवारास कोणत्याही स्वरूपाचा इजा किंवा नुकसानीसाठी वक्फ मंडळ जबाबदार राहणार नाही.

१६.६ उमेदवारांनी एखाद्या विशिष्ट परीक्षा केंद्राची पुरेशा संख्येने निवड केलेली नसल्यास किंवा एखाद्या केंद्राची निवड त्या केंद्राच्या उपलब्ध क्षमतेपेक्षा जास्त

उमेदवारांनी केलेली असल्यास उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेसाठी इतर कोणतेही संलग्न केंद्र वाटप करण्याचा अधिकार निवड समितीस राहील.

१६.७ उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही.

१६.८ सदरची मार्गदर्शक तत्त्वे केंद्र / महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी केलेल्या सूचनांच्या / निर्णयानुसार असून त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने बदल केल्यास ते बदल लागू राहतील.

**१७. अयोग्य वर्तन / अयोग्य माध्यमांचा वापर केल्याबद्दल दोषी आढळलेल्या उमेदवारांविरूध्द कारवाई:-**

उमेदवारांना सुचित केले जाते की त्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करताना कोणतेही खोटे, छेडछाड केलेले किंवा बनावट तपशील सादर करू नयेत आणि कोणतीही महत्तवाची माहिती लपवू नये. परीक्षेच्या वेळी किंवा त्यानंतरच्या निवड प्रक्रियेत, उमेदवार खालील बाबतीत दोषी असल्यास किंवा आढळून आल्यास असा उमेदवार त्याविरूध्द फौजदारी खटला भरणे यासोबतच ज्या परीक्षेसाठी तो उमेदवार आहे त्या परीक्षेसाठी अपात्र ठरविणे, मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी कायमस्वरूपी किंवा विशिष्ट कालावधीसाठी अपात्र ठरविणे किंवा त्याच्या सेवा समाप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(१) अयोग्य मार्गाचा अवलंब करणे,

(२) तोतयागिरी करणे किंवा कोणत्याही व्यक्तीद्वारे तोतयागिरी करून घेणे,

(३) परीक्षा हॉलमध्ये गैरवर्तन करणे किंवा चाचणीची सामग्री किंवा त्यातील इतर कोणतीही माहिती कोणत्याही स्वरूपात तोंडी किंवा लेखी, इलेक्ट्रानिक किंवा यांत्रिकरित्या उद्देशाने उघड करणे, प्रकाशित करणे, पुनरूत्पादन करणे, प्रसारित करणे, संग्रहित करणे किंवा प्रसारित करणेसाठी सुलभ करणे,

(४) त्याच्या/तिच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही अनियमित किंवा अयोग्य मार्गाचा अवलंब करणे, किंवा

(५) अयोग्य मार्गाने त्याच्या/तिच्या उमेदवारीसाठी समर्थन मिळवणे, किंवा

(६) परीक्षा / मुलाखत हॉलमध्ये मोबाईल फोन किंवा संवादाची तत्सम इलेक्ट्रॉनिक उपकरणे बाळगणे.

**१८. उमेदवारांसाठी महत्त्वाच्या सूचना:-**

१८.१ परीक्षा केंद्राचा पत्ता प्रवेश पत्रावर नमूद करण्यात येईल. परीक्षेचे केंद्र/स्थळ/दिनांक वेळ बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

१८.२ परीक्षा प्रवेशपत्रावर नमुद केलेल्या वेळेनंतर परीक्षा केंद्रावर उपस्थित होणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला बसु देण्याची परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेचा कालावधी जरी १२० मिनिटाचा असेल तरी सुध्दा उमेदवारांना परीक्षा केंद्रावरील विहीत प्रक्रिया (उमेदवारांना महत्तवाच्या सुचना देणे, उमेदवारांची व कागदपत्राची पडताळणी करणे, आवश्यक कागदपत्र जमा करणे लॉन इन करणे) पार पाडण्यासाठी उमेदवारांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान १ तास परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे.

१८.३ उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली माहिती कोणत्याही टप्प्यावर चुकीची, अपूर्ण अथवा खोटी आढळून आल्यास उमेदवाराची संबंधित पदासाठीची उमेदवारी रद्द करण्यात येईल व संबंधित उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सुचना / नोटीस अथवा कारण न देता उमेदवार तात्काळ सेवेतुन काढून टाकण्यास पात्र राहील. त्यामुळे होणाऱ्या सर्व परिणामास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

१८.४ ओळख पटविणे- परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलिकडील फोटो चिकवटलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड/ पारपत्र/वाहनचालक परवाना/मतदार ओळखपत्र/फोटो सहितचे पासबुक / महाविद्यालयाचे/ विद्यापीठाचे अलिकडील वैध ओळखपत्र/ कर्मचारी ओळखपत्र/ फोटोसहित असणोर बार कॉन्सिलचे ओळखपत्र समवेक्षक/ पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख ही उमेदवाराचे प्रवेशपत्र हजेरीपत्रक/ उपस्थितीपत्रक त्याने सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहु दिले जाणार नाही.

१८.५ रेशनकार्ड व तात्पुरता वाहन परवाना परीक्षेसाठी वैध ओळखीची पुरावा म्हणुन स्वीकारले जाणार नाही:-

टिप- उपरोक्त परीक्षेला उपस्थित रहातांना उमेदवाराने स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची उपरोक्त नमुदपैकी आवश्यक ते मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायाकींत प्रती, परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवाराचे परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील आणि सादर केलेल्या ओळखपत्रावरील नांव आवेदनपत्रात नोंदणी केल्यानुसार तंतोतंत जुळणे आवश्यक राहील. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या मधल्या, शेवटच्या नावांत विवाहनंतर बदल झाल्या असल्यास त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याचे राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र प्रतिज्ञापत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहु दिले जाणार नाही. सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रासह ऑनलाईन परीक्षेला उपस्थित रहाणे आवश्यक

आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्र नसल्यास उमदेवारास परीक्षेला उपस्थित राहु दिले जाणार नाही.

१. परीक्षेसाठी वैध प्रवेशपत्र
२. मुळ फोटो ओळखपत्र
३. फोटो ओळखपत्राची छायाप्रत

१८.६ ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीस उमेदवार स्वत: जबाबदार राहील त्यास नियुक्ती प्राधिकारी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

**टीप:-** उमेदवारांना परीक्षेला उपस्थित असताना परीक्षेच्या प्रवेशपत्रासह ओळखपत्राच्या पुराव्याची छायांकित प्रत सादर करावे लागेल. त्याशिवाय त्यांना परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही. परीक्षार्थी उमेदवारांनी लक्षात ठेवावे की प्रवेशपत्रावर दिसणारे नाव (नोंदणी प्रक्रिये दरम्यान दिलेले) ओळखपत्रावर दिसत असलेल्या नावाशी तंतोतंत जुळले पाहिजे. विवाहानंतर नाव/आडनाव/मध्यम नाव बदलेल्या महिला उमेदवारांनी याची विशेष्ज्ञ नोंद घ्यावी. प्रवेश पत्र आणि ओळखपत्रामध्ये दर्शविलेले नाव यामध्ये साम्य न आढळल्यास उमेदवाराला परीक्षेला बसू दिले जाणार नाही. ज्या उमेदवारांनी त्यांचे नाव बदलले आहे त्यांच्या बाबतीत, त्यांनी नपाव बदलाबाबतचा पुरावा सादर केला तरच परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाईल.

**१९. इतर अटी:-**

१९.१ परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या येण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही ज्यामुळे ऑनलाईन चाचणी वितरणावर तसेच निकालावर परिणाम होऊ शकतो. अशावेळी या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. तथापि, यामध्ये उमेदवारांची हालाचाल, व परीक्षेला विलंब होणे यासारख्या बाबी गृहीत धरण्यात आलेल्या आहेत. परीक्षेचे फेर आयोजन हे निवड समितीच्या / परीक्षा आयोजित करणाऱ्या संस्थेच्या पूर्ण निर्णयावर अवलंबवून राहील. परीक्षेच्या फेर आयोजनासाठी उमेदवारांचा कोणताही दावा राहणार नाही. चाचणी वितरणाची विलंबित प्रक्रिया न स्विकारणारे, हालचालीस नकार देणारे किंवा अशा प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छुक नसलेले उमेदवार सरसकटपणे निवड प्रक्रियेतुन बाद ठरविले जातील.

१९.२ परीक्षेशी संबंधित सर्व बाबींमध्ये निवड समितीचा निर्णय अंतिम असेल आणि तो उमेदवार बंधनकारक असेल, या संदर्भात निवड समितीद्वारे कोणताही पत्रव्यवहार किंवा वैयक्तिक चौकशी केली जाणार नाही.

१९.३ परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये घेतल्यास, विविध सत्रांमधील वापरल्या जाणाऱ्या चाचणीमधील अडचण पातळी विचारात घेऊन विविध संत्रामधील गुण समायोजित करून समतुल्य करण्यात येतील. परीक्षा केंद्राची / परीक्षा केंद्रावरील नोडची

(Node) क्षमता कमी असल्यास किंवा कोणत्याही केंद्रावर किंवा कोणत्याही उमदेवारासाठी काही तांत्रिक व्यत्यय आल्यास अशा केंद्रावर एकापेक्षा जास्त सत्रे आयोजित केली जाऊ शकतात.

१९.४ वक्फ मंडळ उमेदवारांच्या वैयक्तिक प्रतिसादांचे (उत्तरे) विश्लेषण इतर उमेदवारांच्या प्रतिसादांशी अचूक आणि चुकीच्या उत्तरांच्या समानतेचे नमुने शोधण्यासाठी करेल. यासदंर्भात वक्फ मंडळाद्वारे अवलंबलेल्या विश्लेषणात्मक प्रक्रियेत प्रक्रियेत, उमेदवाराची उत्तरे एममेकांसोबत वाटप (share) केलेली आहेत त्यांना मिळालेले गुण खरे/ वैध नाहीत असा निष्कर्ष निघाल्यास निवड समिती अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवते तसेच अशा उमेदवारांचे निकाल रोखले जातील.

१९.५ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे किंवा उमेदवांराकडून निवड प्रक्रियेचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास उमेदवार निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरेल आणि त्याला/ तिला यापुढे कोणत्याही निवड प्रक्रियेमध्ये भाग घेण्यास प्रतिबंध करण्यात येईल.

## २०. गुण पध्दती:-

खालील पध्दतीचा अवलंब करून ऑनलाईन परीक्षेचे गुण ठरविले जातात:

२०.१ वस्तुनिष्ठ चाचणीमध्ये प्रत्येक उमेदवाराने अचून उत्तर दिलेल्या प्रश्नांची संख्या अंतिम गुणांसाठी विचारात घेतले जातील.

२०.२ परीक्षा एकापेक्षा जास्त संत्रामध्ये घेण्यात आलेली असल्यास वरीलप्रमाणे उमेदवाराने संपादित केलेले अंतिम गुण विविध संत्रामधील वापरल्या जाणाऱ्या चाचणीमधील अडचण पातळी विचारात घेऊन विविध संत्रामधील गुण समायोजित करून समतुल्य करण्यात येतील.

## २२. निवडीचे निकष:-

जाहिरातीत नमुद विविध पदांवरील नियुक्त्या या सदरच्या परीक्षेच्या आधारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीच्या आधारे निवड करून, करण्यात येतील, परीक्षेद्वारे निवडीसाठी आवश्यक किमान गुण व परीक्षेमध्ये उमेदवारांना समान गुण मिळाल्यास गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं १२२२/प्रक्र.५४/का.१३-अ, दि. ४ ते, २०२२ मधील तरतुदीनुसार राहील.

## २३. उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यासाठी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे सादर करावयाच्या आवश्यक कादपत्रांच्या तपशील:

२३.१ परीक्षेसाठी केलेल्या ऑनलाईन आवेदन पत्राची छायांकित प्रत.

२३.२ शैक्षणिक अर्हतेबाबतची कागदपत्रे

२३.३ संगणक परीक्षा उत्तीर्ण झालेली असल्यास प्रमाणपत्र

२३.४ परीक्षा शुल्क भरणा केलेल्या पावतीची प्रत

**२४. सेवाप्रवेशोत्तर शर्ती:-**

२४.१ ज्या पदांकरिता प्रचलित नियमानुसार विभागीय / व्यावसायिक परीक्षा विहीत केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय / व्यावसायिक परीक्षा

२४.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यातुन सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

२४.३ संगणकाच्या ज्ञानासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण-२००० / प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९ मार्च, २००३ तसेच शासन निर्णय माहीती तंत्रज्ञान विभाग (सा.प्र.वि) विभाग क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ४ फेब्रुवारी २०१३ नुसार संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक.

**२५.** सदर जाहिरात अल्पसंख्याक विकास विभागाच्या **https://mdd.maharashtra.gov.in** व वक्फ मंडळाच्या **https://mahawakf.com** आणि **https://mahawaqf.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

स्थळ- औरंगाबाद

दिनांक- ०४ /०८/२०२३

**(मो.बा. ताशिलदार)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद**